ISSN 2278-5914

**Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara**
(Inst. Reg. No.Maharashtra/13482/satara/2010)
**E-mail ID : sisms2010@gmail.com**

Research Booklet

# SANSHODHAN

# संशोधन

*** Chief Editor ***

Dr.Vishvanath Pawar

*** Co-Editorial Board ***

Dr.Pratibha Chikmath
Prof.Deepak Jadhav
Dr.Ajitkumar Jadhav
Dr.Jaypal Sawant
Prof. Ganesh Vidhate
Dr.Sumit Yadav
Prof. Mahadev Chinde

**2016**

Research Booklet
ISSN 2278-5914

# SANSHODHAN

## * Peer Review Committee *

1. **Principal Dr.Vijayrao Nalawade**
   Ex.President, Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara.
2. **Dr.V.S.Jadhav**
   President, Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara.
3. **Dr.Deepak Deshpande**
   Principal, Babasaheb Chitale Mahavidyalay, Bhilawadi
4. **Dr.Shirishkumar Pawar**
   Principal, Balasaheb Desai College, Patan
5. **Dr.Rajendra More**
   Principal, Shri Raosaheb Ramrao Patil Mahavidyalay, Savalaj
6. **Shri.A.G.Thorat**
   Arts and Commerce College, Nagthane
7. **Dr.Vishvanath Pawar**
   Chhatrapati Shivaji College, Satara.
8. **Dr.C.G.Patil**
   Padmabhushan Dr.Vasantdada Patil Mahavidyalay, Tasgaon.
9. **Prof.Dilipkumar Mohite**
   Shikashanmaharshi Bapuji Salunkhe Mahavidalay, Karad.
10. **Dr. Nalini Waghamare**
    Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune.
11. **Dr.Kalpna Mohite**
    Yashawantrao Chavan Arts & Commerce College, Islampur.
12. **Dr.Anil Jagtap**
    Arts& Commerce College, Pusegaon.
13. **Shri. Raju Bhise**
    Yashawantrao Chavan College, Pachwad
14. **Shri. Bhimrao Kakade**
    Sharadchandra Pawar College, Lonand
15. **Prof.Sidheshwar Sapakal**
    Arts& Commerce College, Mayani
16. **Shri.Goutam Dhumal**
    Raja Bhagwantrao Pantpratinidhi College, Aundh.
17. **Shri. S.L.Gejage**
    Amdar Shashikant Shinde College, Medha.
18. **Dr.Ajitkumar Jadhav**
    Arts& Commerce College, Nagthane

३४. जनसामान्यांचा नेता : किसन वीर
प्रा.डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत ९७

३५. श्री.यशवंतराव मोहिते यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य
प्रा.डॉ.पी.बी.गायकवाड १००

३६. बाबूजी नाईक बारामतीकर
प्रा.सौ.वंदना रामचंद्र लोंढे १०३

३७. देवीसिंग चौहान यांनी संपादन केलेले दक्खनी हिंदीतील साहित्य व त्याचा इतिहास लेखनाला उपयोग
अमृत दत्तात्रय साळुंखे १०५

३८. THE MICRO STUDY OF SHRI AILLAK PANNALAL DIGAMBAR JAIN PATHASHALA
Dr. Dhanaji Baburao Masal १०८

३९. ज्ञानोदय मधील स्त्रीयांचे स्थान
श्री.चंद्रशेखर काशिनाथ काटे १११

४०. सत्यशोधक समाजाचे सातारा जिल्ह्यातील कार्य
प्रा.डॉ.अनिल शिवाजी टिके ११४

४१. इतिहासलेखनातील नवीन प्रवाह लोककवी वामनदादा कर्डक यांचे समाजप्रबोधनात्मक कार्य
प्रा. डी. के. रसाळ
प्रा. के. एस. शिंदे ११७

४२. दलितांचे आधारस्तंभ- यशवंतराव चव्हाण
प्रा.डॉ.चंपाताई श्रीरंग बोधले १२०

४३. यशवंतराव पांडूरंग पोवार तथा वाय.पी.पोवार
डॉ.विजय विष्णू पाडळकर १२२

४४. रिपब्लिकन पक्षाचे कार्य व त्याचे राजकीय महत्व
डॉ.संगिता व्ही.सरवदे १२५

४५. वाईतील पारंपारिक कृष्णाबाई व गणेशोत्सव
प्रा.डॉ.दत्तात्रय ज्ञानदेव कोरडे १२८

४६. इतिहासलेखनाच्या साम्य-सम्यक भौतिकवादी समाजशास्त्रीय, मार्क्सवादी व नवमार्क्सवादी इतिहासलेखन चिकित्सा
प्रा.रामचंद्र घुले १३०

४७. आगरी समाज आणि सहकार पद्धती
प्रा.डॉ.सुभाष लक्ष्मण म्हात्रे १३४

४८. अभारतीय मराठा इतिहास लेखन
प्रा.शशिकांत महादेव मोहीते १३६

४९. पलूसचे साहित्य वैभव : स्वामी विवेकानंद वाचनालय
प्रा.डॉ.संगीता संपत पाटील १३९

५०. इतिहास लेखनातील नवीन प्रवाह
प्रा. डॉ. प्रमोद बोराडे १४२

५१. उरूण इस्लामपूर नगरपालिका कर्मचारी संघटनेचा ऐतिहासिक आढावा
श्री.सतिश चौगुले १४४

५२. हैद्राबाद मुक्ति संग्राम आणि विद्यार्थी चळवळ (विशेष संदर्भ मराठवाडा)
प्रा.डॉ.सौ. गीतांजली भीमराव बोराडे १४६

# ४४. रिपब्लिकन पक्षाचे कार्य व त्याचे राजकीय महत्व

डॉ.संगिता व्ही.सरवदे
श्री.अण्णासाहेब डांगे कॉलेज,
हातकणगले, जि.कोल्हापूर.

सन १९२१ पासून ते सतत १९५६ पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांना राजकीय दृष्टीकोनातून जागृत करण्याचा, त्यांना शासन कर्तिजमात बनविण्याचा आणि सरकारला सहकार्य करून अस्पृश्यांच्या हक्काचे आणि देशाची सेवा करण्याचा प्रयत्न करीत होते. रिपब्लिकन पक्ष स्थापन होण्यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्ष आणि सन १९४२ मध्ये शेडूल्डकास्ट फेडरेशन असे दोन राजकीय पक्ष स्थापन केले होते. समाजातील सर्व दलित, आदिवासी, मागासलेले वर्ग यांना बरोबर घेऊन जाणारा व कष्टकरी, कामगार, शेतकरीवर्ग यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्यासाठी त्यांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे ठरवले होते.

**उद्देश :** रिपब्लिकन पक्षाच्या कार्याचा आढावा घेवून दलितांच्या राजकीय सबलीकरणासंबंधीच्या अडचणींचा मागोवा घेणे.

**रिपब्लिकन पक्षाची स्थापना :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दि. ३० सप्टेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे 'अखिल भारतीय दलित फेडरेशन' च्या कार्यकारिणीची बैठक घेतली व या बैठकीत काँग्रेसला विरोधी पक्ष स्थापन करण्याचे आणि त्या पक्षाला 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' हे नाव देण्याचे ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे समर्थक होते. लोकशाही व्यवस्थेचे आणि सांसदीय राज्यपध्दतीचे योग्य रक्षण करण्यासाठी देशामध्ये प्रभावी असा विरोधी पक्ष असला पाहिजे. जर विरोधी पक्ष नसेल तर त्या व्यवस्थेला हुकुमशाही स्वरूप प्राप्त होत असते. या भूमिकेतूनच समाजातील सर्व दलित, आदिवासी, मागसलेले वर्ग यांना बरोबर घेऊन जाणारा व कष्टकरी, कामगार, शेतकरीवर्ग यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचा आराखडा बाबासाहेबांनी आपल्या मृत्यूपत्रात तयार ठेवला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणामुळे दलित जनतेचे व दलित चळवळीचे मोठे नुकसान झाले. दि. ०६ डिसेंबर १९५६ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांचे रिपब्लिकन पक्ष काढण्याचे काम त्यांच्या अनुयायांनी रीतसर विजयादशमीच्या ऐतिहासिक पर्वावर दि. ०३ ऑक्टोबर १९५७ रोजी ८ लक्ष लोकांच्या विराट उपस्थितीत रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली.[१] या पक्षाचे अध्यक्ष म्हणून मद्रासमधील वयोवृध्द दलित नेते आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एक अत्यंत निकटचे सहयोगी श्री.एन.सिवराज यांना निवडण्यात आले. तर बॅ.राजाभाऊ खोब्रागडे हे पक्षाचे जनरल सेक्रेटरी होते. रिपब्लिकन पक्षाचे लोकसभेमध्ये दादासाहेब गायकवाड, बी.सी.कांबळे, सदानंद डिगे, जी.के.माने, हरिहरराव सोमुले. दत्ता कट्टी होते.[२]

**रिपब्लिकन पक्ष व त्याची कामगिरी :** सन १९५७ ते १९५९ पर्यंतच्या कालखंडात हा पक्ष एक संघ होता. या काळात रिपब्लिकन पक्षाचे लोकसभेमध्ये दादासाहेब गायकवाड, बी.सी.कांबळे, श्री.एस के दिघे, जी.के.माने, बी.डी.साळूंखे, हरिहरराव सोनुले, दत्ता कट्टी, एन सिवराज आणि के.यू.परमान असे एकून नऊ सदस्य होते आणि राज्य सभेमध्ये बॅ.राजाभाऊ खोब्रागडे अषा रितीने संसदेमध्ये रिपब्लिकन पक्षाचे दहा सभासद होते. या पक्षाच्या खासदारांनी दलित बौधांच्या सवलतींविषयी त्यांचा विकास करण्याविषयी, पंचायत कायद्याविरोधी, शाळा कॉलेजमधून बौध्द धर्माचे शिक्षण देण्याविषयी, भूमीहिनांना पडिक जमीन देण्याविषयी अशा अनेक विधविषयावर आवाज उठवला. त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने सभागृहामध्ये त्याचप्रमाणे सभागृहा बाहेरही आपल्या विचारांना अनुकूल वातावरण बनवण्याचा प्रयत्न केला. दलितांवरील अत्याचाराचा उल्लेख करून त्यांनी अत्याचार करणाऱ्यांचा आणि अत्याचार थांबवण्यास असमर्थ असलेल्या शासनाचा निषेध केला. तसेच ज्यांच्यावर अन्याय अत्याचार झालेला होता त्यांना दाद मागवून देण्याचा प्रयत्न केला.[३] संसदेच्या बाहेर जनजागृती करून आपल्या प्रभावी विचारांनी एक नवपिढी निर्माण केली. रिपब्लिकन पक्षाने पुढील प्रमाणे कार्य केले.

१) समता सैनिक दलाचे पुनरूजीवन केले. सन १९२८ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाची स्थापना केली होती. दलाचे मुख्यकार्य म्हणजे सर्व क्षेत्रामध्ये समता प्रस्थापीत करणे व दलितांसाठी एक स्वंसेवी संघटना म्हणून कार्य करणे हे होते. रिपब्लिकन पक्षाच्या मार्गदर्षनाखाली आखिल भारतीय समता सैनिक दलाचे अधिवेषन नागपूर येथे भरविले होते.

२) दलित साहित्य संघाच्या स्थापनेमध्यें महत्व पूर्ण भूमिका बजावली. महाराष्ट्र दलित साहित्य संघाचे पहिले अधिवेशन मुंबईला दि. ०२ मार्च १९५८ ला भरले. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून खासदार बी.सी.कांबळे यांना निमंत्रित केले होते. संमेलनाचे संयोजक श्री.टी.पी.अडसूळ होते.

३) रिपब्लिकन पक्षाने आखिल भारतीय रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन नावाची विद्यार्थीची संघटना स्थापन केली होती. या संघटनेचे सेक्रेटरी म्हणून बी. डी. कांबळे यांनी काही काळ काम पाहिले.

४) रिपब्लिकन पक्षाने कामगारांच्या संघटना बांधण्याच्या क्षेत्रामध्येही महत्वाचे कार्य केले. नागपूरला दि.०२ ऑक्टोबर १९५७ ला

कनिष्ठगाव कामगार व अखिल भारतीय कामगार परिषद भरली होती या परिषदेमध्ये कामगारांच्या मागण्या मंजूर करून घेण्यासाठी एक समीतीची स्थापना करण्यात आली होती. या समितीचे अध्यक्ष खासदार दादासाहेब गायकवाड होते.[४]

५) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्मारके उभारण्यासंबंधी देखील रिपब्लिकन पक्षाने प्रयत्न केले. पक्षाच्या मुंबई शाखेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक निधी देखिल स्थापन करण्यात आला होता. पक्षाकडे महाड, नागपूर व मुंबई येथे बाबासाहेबांची स्मारके उभी करण्याच्या योजना होत्या. पुढे ती पूर्ण झाली.

६) रिपब्लिकन पक्ष कार्यकर्त्यांनी बौध्द धम्माच्या प्रचाराचे व प्रसाराचे महत्वाचे कार्य केले. ज्या वेळी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली त्याच वेळी बाबासाहेबांच्या अनुयायांनी भारतीय बौध्दमहासभेचे पहिले अधिवेशन धम्मचक्र प्रवर्तन दिनी दि. २३/२४, १९५७ नागपूर येथे घेतली बौध्दमहासभेचे अध्यक्ष म्हणून भय्यासाहेब आंबेडकरांना निवडण्यात आले होते.[५]

७) या काळात महाराष्ट्रतील व मध्यप्रदेशातील अनेक ठिकाणी बौध्दधम्म दिक्षेचे कार्यक्रम आयोजीत केले होते. त्यामुळे लाखो लोकांनी बौध्द धम्म स्वीकारला. एवढेच नव्हे तर मुंबईला श्री. दा.ता.रूपवते यांच्या हस्ते वाघ्या मुरळी व देवदासींनाही बौध्द धम्माची दिक्षा देण्यात आली हिंदू धर्माचा व मानहानीच्या व्यावसायाच्या त्याग करायला लावून त्यांना बौध्द धम्माची दिक्षा देऊन नैतिक जीवनाकडे वळविण्याचा रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला.[६]

८) गायरान जमिनींचा लढा : दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली गायरान जमिनींचा प्रश्न घेऊन लढा उभारला. ग्रामीण भागातल्या जमीनदारांच्या आर्थिक पिळवणुकीपासून दलित गरिबांची सुटका करायची असेल तर त्यांना त्यांच्या मालकीच्या जमिनी मिळवून दिल्या पाहिजे असे डॉ.आंबेडकरांना नेहमी वाटत असे. रिपब्लिकन पक्षाने बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचारानुसार आपल्या कार्यक्रमानुसार जमिनीचे राष्ट्रीयीकरण केले जाईल असे स्पष्ट केले होते. दलितांची आर्थिक दुर्बलता नष्ट करण्यासाठी दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली इ.स. १९५३ पासून नाशिक, जळगाव, धुळे व अहमदनगर जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी भूमिहीनांनी सत्याग्रह केले.

माहे ऑगस्ट १९५९ मध्ये भूमिहीनांचा सत्याग्रह करण्याचा कृतीकार्यक्रम एन.सिवराज, दादासाहेब गायकवाड, इत्यादींनी जाहीर केला. अनेक ठिकाणी छोटे-मोठे सत्याग्रह सुरू झाले. इ.स. १९५६ ते १९६४ या कालखंडात देशभर सत्याग्रह होत राहिले. देशभरातून अनेक ठिकाणी सरकारी कचेऱ्यांवर, प्रत्यक्ष कसजमिनींवर, कोर्टांवर मोर्चे काढले गेले. त्यांत लहान मुले, स्त्रिया व वृध्द या सर्वांचाच समावेश होता.[७]

महाराष्ट्राबरोबरच दि. ०६ डिसेंबर १९६४ रोजी पंजाबमध्ये चारशे सत्याग्रहींना अटक झाली. त्यांचे नेतृत्व चननराम, बाली, अजितकुमार इत्यादींनी केले. दिल्लीमध्ये लाला हरिश्चंद्र यांच्या नेतृत्वाखाली भू-सत्याग्रह करून जेलभरो आंदोलन करण्यात आले. उत्तर प्रदेशामध्ये डॉ. गौतम, डॉ.अब्दुल बशीरखान यांनी भू-सत्याग्रहाचे नेतृत्व केले. कर्नाटकात दत्ता कट्टी व आर.मुगम यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. मध्य प्रदेशात हरिश्चंद्र ऋषींनी जनआंदोलन छेडले. गुजरात राज्यातही गोविंद परमार यांनी भू-मोर्च्यांचे आयोजन केले. आंध्र प्रदेशात रामस्वामी विमुक्ता चैय्या यांनी सत्याग्रह घडवला. एन.शिवराज यांची कर्मभूमी असणाऱ्या तामीळनाडूमध्येही कृष्णास्वामी, श्रीमती मीनांबल शिवराज यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षाकडून दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली देशभर भूमिहीनांचा सत्याग्रह केला गेला.

या लढ्यात स्त्रियांनीदेखील मोठा सहभाग नोंदवला. दादासाहेबांच्या पत्नी व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनपासून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियापर्यंत समाजकारण व राजकारणात सक्रिय असणाऱ्या गीताबाई गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली दि.११ डिसेंबर १९६४ रोजी दिल्लीमध्ये महिला मोर्चा निघाला होता. मोर्च्यातील १०० महिलांनी स्वतःला अटक करून घेतली होती. चंदिगडमध्येही बत्तीस स्त्री-पुरूषांना अटक झाली होती. श्रीरामपूरला दादासाहेब रोहमांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्च्यात बारा पुरूष व तेवीस स्त्रिया तुरूंगात गेल्या होत्या. माजलगावमध्ये कृष्णाबाई वि.टाकणखार यांच्या नेतृत्वाखाली स्त्रियांचा मोर्चा निघाला होता. १८ डिसेंबर १९६४ रोजी तिरोडा येथे महिलांनी डाक बंगल्यावर सत्याग्रह केला. अकोला जिल्ह्यात झालेल्या सत्याग्रहात ५०० महिलांनी स्वतःला अटक करून घेतली होती. हतगावात १२२ स्त्री-पुरूषांना अटक झाली होती. श्रीमती कलावतीबाई खंडारे यांच्या नेतृत्वाखाली महिलांचा मोर्चा जिल्हाधिकारी कचेरी (अकोला) वर निघाला. या मोर्च्याचे वैशिष्ट्य म्हणजे घरादाराला कुलूप लावून, जनावरे शेजाऱ्यांवर सोपवून लहान मुले व कोंबड्यांची खुराडी आपल्या खांद्यावर घेऊन अकोल्यातील महिला मोर्च्यात सहभागी झाल्या होत्या.[८]

**रिपब्लिकन पक्षातील फूट :** भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन झाल्यानंतर अवघ्या दोन वर्षांच्या आतच दुभंगला आणि पुढे वेळोवेळी दुभंगत राहिला. एकीकरणाच्या प्रयत्नानंतरही पुन्हा रिपब्लिकन पक्ष फुटला त्यानंतर दोन मुख्य गट राहिले, एक गट रा.सु.गवई यांचा आणि दुसरा गट बॅ.राजाभाऊ खोब्रागडे यांचा.[९]

पक्षाच्या फुटीने व नेत्यांच्या स्वार्थी वृत्तीने दलितांच्या राजकीय चळवळीला खीळ बसत आहे बाबासाहेबांच्या निधनानंतर रिपब्लिकन पक्ष स्थापन झाला. परंतु इ. स. १९५७ मधील लोकसभेच्या निवडणूकीत दलित नेत्यांनी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनमार्फत संयुक्त महाराष्ट्र समितीबरोबर युती करून निवडणूका लढवल्या त्या वेळी पक्षाचे आठ उमेदवार निवडून आले. परंतु, इ.स. १९८० ते १९९६ या काळात लोकसभेसाठी पाच वेळा निवडणूका घेण्यात आल्या मात्र कोणत्याही रिपब्लिकन पक्षाच्या गटाला एकही जागा जिंकता आली नाही.[१०]

आज रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट अस्तित्वात आहेत. यामध्ये प्रामुख्याने प्रकाश आंबेडकर यांचा भारिप बहुजन महासंघ, रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), रा.सु.गवई यांचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया-गवई गट, प्रा.जोगेंद्र कवाडे यांचा पीपल्स रिपब्लिकन पार्टी(पी.आर.पी.) दुसरा गट बॅ.खोब्रागडे यांचा.[११]

रिपब्लिकन पक्षाने महिलांची संघटना बांधण्याचा प्रयत्न केला होता. दि. ०२ ऑक्टोंबर १९५७ मध्ये नागपूर येथे अखिल भारतीय महिला परिषद भरवण्यात आली. तिच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द महिला नेत्या श्रीमती शांताबाई दाणी होत्या. अध्यक्षपदावरून बोलताना त्या म्हणाल्या, "स्त्रियांना शिक्षण देणे अत्यावश्यक आहे. घरातील वळण स्त्रीवरच अवलंबून असते. मुलांवर होणारे संस्कार स्त्रीच करू शकते आणि म्हणून तिला सुसंस्कृत बनवणे अगत्याचे आहे. सुसंस्कृत बनवण्यासाठी शिक्षण हेच प्रमुख साधन आहे.[१२]

**रिपब्लिकन पक्षाचे जनसंपर्काचे साधन प्रबुध्द भारत** : इ.स. १९५७ ते १९५९ या काळामध्ये रिपब्लिकन पक्षाकडे जनसंपर्काचे प्रबुध्द भारत नावाचे महत्वाचे साप्ताहिक होते. प्रबुध्द भारताच्या संपादक मंडळामध्ये खासदार दादासाहेब गायकवाड, आमदार आर.डी.भंडारे, खासदार बी.सी.कांबळे, मुकुंदराव आंबेडकर, घनश्याम तळवटकर आदी नेते होते. रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्र म्हणून 'प्रबुध्द भारता' ने महत्वपूर्ण कामगिरी बजावली.[१३] पण आज पक्षाकडे कोणतेही मुखपत्र नाही.

इ. स. १९७० नंतर रिपब्लिकन पक्षाने रस्त्यावरचे जनसामान्यांचे प्रष्न घेऊन लढण्याऐवजी राखीव जागा, सवलती या सुरक्षित प्रश्नावरच काम करू लागल्याने पक्षाचा जनसामान्यावरचा प्रभाव कमी झाला. असे असले तरी रिपब्लिकन पक्षाच्या सर्वच नेत्यांनी अनेक सभा, संमेलने, निवेदने, जयंती उत्सव, आदींमधून आपल्या मागण्यांचा पाठपुरावा केला. नामांतराच्या चळवळीला सर्वांनी पाठींबा दिला होता.

**निष्कर्ष** : रिपब्लिकन पक्षा कडून लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेच्या माध्यामातून सत्तेत सहभागी होण्याचा प्रयत्न केला जातो. वेगवेगळ्या पक्षांशी युती केली जाते पण त्यांना म्हणावे तसे यश येत नाही. कारण त्यांना सवर्णाच्या मतावर अवलंबून रहावे लागते. कारण पक्षाला आजूनही सामाजीक अभिसरनाची प्रक्रिया गतीमान करता आली नाही. समाजातील सर्व दलित कष्टकरी समाजाची मोट त्यांना बांधता आली नाही. असे तरी रिपब्लिकन पक्षाने दबावगटाचा वापर करून दलितांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. रिपब्लिकन पक्षाने जनजागृतीचे कार्य केले. या मार्फत दलितांचा स्वाभिमान व आत्मविश्वास वाढवला. महिलांना या लढ्यात सामाऊन घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्वज्ञान लोकांपर्यंत, विषेशतःअशिक्षित अशा दलिता पर्यंत नेऊन पोहचविणे अत्यंत अवघड काम होते परंतू ते रिपब्लिकन पक्ष कार्यकर्त्यांनी अत्यंत चांगल्या रितीने केले. आंबेडकरी विचाराने दलितांचे प्रष्न समजावून घेऊन ते सोडण्याचे काम रिपब्लिकन पक्ष करू षकतो. इतर पक्ष मात्र दलितांच्या प्रश्नाकडे गांधीवादी दृश्टिकोनातून सहानुभूतीने बघण्याचा धोका आहे. पण संपूर्ण परिवर्तनाचा विचार घेऊन चालणारा रिपब्लिकन पक्षच दलितांचे मुलभूत प्रश्न समज शकतो व सोडवू शकतो.

**संदर्भ :**


१. प्रबुध्द भारत, रिपब्लिकन पार्टी स्थापना विशेषांक, ०१ ऑक्टोबर १९५७, पुनःप्रकाशन २००७ दिक्षाभूमी संदेश, नागपूर, पृ. २५.
२. क्षीरसागर, रामचंद्र, भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २००६ पृ. ५७.
३. उपरोक्त पृ. ८२.
४. प्रबुध्दभारत दि. १२ ऑक्टोबर १९५७.
५. प्रबुध्दभारत दि. ०६ जून १९५९.
६. क्षीरसागर, रामचंद्र, भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २००६, पृ. ८४.
७. परदेशी प्रतिमा, योध्दा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड, दिनांक प्रकाशन, २००२, पुणे, पृ. ४०.
८. उपरोक्त पृ. ४२.
९. क्षीरसागर, रामचंद्र, भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २००६, पृ. ८८.
१०. उपरोक्त पृ. १५०.
११. उपरोक्त पृ. १५७.
१२. प्रबुध्द भारत १९ ऑक्टोबर १९५७.
१३. क्षीरसागर, रामचंद्र, भारतीय रिपब्लिकन पक्ष, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २००६, पृ. १५०.